**पनवेल महानगरपालिका**
**धोकादायक/ अतिधोकादायक इमारतींबाबत जाहीर सूचना**
**सन २०२६-२७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भ विसआ-२१५/ प्र.क्र. ३४९/ नवि-२०, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०१५ नुसार व त्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेने निश्चित केलेल्या कार्यपध्दती (एस. ओ.पी.) नुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे संबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असुन, सर्वेक्षणाअंती प्रभाग समिती अ- ४, प्रभाग समिती ब- २०, प्रभाग समिती क- ८, प्रभाग समिती ड- ३२ अतंर्गत एकुण ६४ सी-१ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहिर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवळी नोटिसद्वारे कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक/ भोगवटादार यांना पुरेशी संधी देऊनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापी काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. पुढील कालावधीत पावसाळा सुरु होणार असून अतिवृष्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करुन, विना विलंब सदर अतिधोकादायक / धोकादायक इमारती स्वत:हुन सुरक्षितरित्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या संबंधित नागरीकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरु यांची राहील. त्याचप्रमाणे अतिधोकादायक मालमत्तांचे स्ट्रक्चरल ऑडीट (Structural Audit) करुन घेण्याची जबाबदारी संबंधित घरमालक/ भोगवटादार यांची राहील. याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अशा मोडकळीस आलेल्या धोकादायक/ अतिधोकादायक इमारतींची यादी महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळ (Website) प्रसिध्द करणेत आलेली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांची जीवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरीकांनचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरीक म्हणुन आपआपल्या परिसरातील इमारतीवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करुन सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे.

आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी/ Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.
दूरध्वनी क्रमांक :- **०२२- ७४५८०४०/४१/४२**
Toll Free क्रमांक :- **१८००-२२७-७०१**

(मंगेश चितळे)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

पमपा/अ.बां.नि./२४२६/जा.क्र. / २०२६
दिनांक : / /२०२६